निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शनिवार
१७ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३२३ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# महापालिकेत भाजप-शिवसेना युतीचा झंझावात; 'एमआयएम'चे बालेकिल्ले शाबूत तर 'वंचित'नेही दाखवला दम!

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** महानगरपालिका निवडणुकीच्या निकालांचे जे चित्र समोर आले आहे, त्यावरून शहरात पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेच्या (शिंदे गट) युतीने आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. अनेक प्रभागांमध्ये विरोधकांचे डिपॉझिट जप्त करत युतीच्या उमेदवारांनी दणदणीत विजय मिळवला आहे.

### प्रस्थापितांना धक्का, नव्या चेहऱ्यांना संधी!

या निवडणुकीत अनेक प्रभागांत अपक्ष उमेदवारांनी आणि छोट्या पक्षांनीही महाविकास आघाडी आणि युतीच्या उमेदवारांची मते खाल्ल्याचे दिसून आले. मात्र, संघटित प्रचार आणि कामाच्या जोरावर भाजपने शहराच्या बहुतांश भागांत कमळ फुलवले आहे.

या विजयानंतर आता शहराच्या महापौरपदासाठी आणि सत्तेच्या चाव्या कोणाकडे राहणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. एमआयएम आणि भाजप यांच्यातील ही थेट लढत आगामी विधानसभा निवडणुकीची नांदी मानली जात आहे.

दुसरीकडे, एमआयएमने मुस्लिम बहुल भागात आपली पकड मजबूत ठेवली असली तरी, काही ठिकाणी त्यांना अटीतटीच्या लढतीचा सामना करावा लागला.

**भाजपचा 'विजयरथ' सुसाट!**

प्रभाग क्रमांक ७, ८, १०, ११, २० आणि २१ मध्ये भारतीय जनता पार्टीने अक्षरशः क्लिन स्वीप दिला आहे. विशेषतः प्रभाग ८ मध्ये भारती सोनवणे (१०,०३८ मते), रामदास हरणे (९,३३८ मते), मोहिनी गायकवाड (११,३०३ मते) आणि विजय अवताडे (१२,४०५ मते) यांनी प्रतिस्पर्ध्यांना धूळ चारत भाजपचा झेंडा फडकवला.

प्रभाग १० मध्ये अर्चना चौधरी यांनी ६,२८५ मतांच्या मोठ्या फरकाने विजय मिळवून महापालिकेत भाजपची ताकद वाढवली आहे.

**'एमआयएम'चे वर्चस्व कायम; मोठ्या फरकाने विजय**

एमआयएमने प्रभाग ५, ६, १२ आणि १३ मध्ये एकतर्फी विजय मिळवत आपली ताकद दाखवून दिली.

**विक्रमी आघाडी:** प्रभाग १३ मध्ये जोहरा समीरबिन हैद्रा यांनी तब्बल २१,३७१ मते घेत १९,१०७ मतांच्या ऐतिहासिक फरकाने काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव केला.

प्रभाग १२ मध्येही सय्यद सोहेल आणि शेर खान यांनी २०,००० पेक्षा जास्त मते मिळवून विरोधकांना चारीमुंड्या चित केले.



**शिवसेना (UBT) आणि 'वंचित'ची झुंज**

काही प्रभागांमध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने आणि वंचित बहुजन आघाडीने युतीला कडवी झुंज दिली.

प्रभाग ३ मध्ये वंचित बहुजन आघाडीने वर्चस्व गाजवत अमित भुईगळ, जरीना कुरेशी, करुणा जाधव आणि अफसर खान या चारही जागांवर विजय मिळवला.

प्रभाग ४ मध्ये शिवसेनेच्या (UBT) प्रेमलता दभाडे, ए. रशीद खान आणि गणेश लोखंडे यांनी विजय मिळवून अस्तित्वाची लढाई जिंकली.

**लक्षवेधी लढती आणि मोठे विजय**

प्रभाग २२ (क): येथे सर्वात अटीतटीची लढत झाली. शिवसेनेच्या यशोदा शेळके (७,३९२ मते) यांनी भाजपच्या सुवर्णा तुपे (७,३०७ मते) यांचा केवळ ८५ मतांनी पराभव केला.

प्रभाग २ (ड): भाजपचे राजगौरव वानखेडे यांनी ११,११० मते घेत एमआयएमच्या उमेदवारावर ६,८९१ मतांनी दणदणीत विजय मिळवला.

प्रभाग २९: येथे शिवसेनेने (शिंदे गट) पूर्ण वर्चस्व राखले असून सिद्धार्थ शिरसाट, अनिता घोडेले आणि श्वेता त्रिवेदी यांनी मोठ्या फरकाने विजय मिळवला आहे.

# जालना ठप्प होणार! धनगर आरक्षण रॅलीचा एल्गार; उद्या 'या' मार्गांवर नो-एंट्री!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी दीपक बोऱ्हाडे यांच्या नेतृत्वाखाली उद्या, १७ जानेवारी रोजी जालन्यातून मुंबईच्या दिशेने विराट रॅली निघणार आहे. या रॅलीला मिळणारा प्रचंड प्रतिसाद पाहता प्रशासनाने कंबर कसली असून, जालना शहरातील आणि जिल्हाभरातील वाहतूक मार्गांत मोठे बदल करण्यात आले आहेत.

रॅलीच्या काळात महामार्गावर मोठी गर्दी होण्याची शक्यता असल्याने पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी वाहतूक वळवण्याचे कडक आदेश जारी केले आहेत.

हे मार्ग राहतील बंद आणि असे असतील पर्यायी रस्ते:उद्या सकाळी ८:०० वाजेपासून रॅली जिल्ह्याच्या हद्दीबाहेर जाईपर्यंत खालील बदल लागू राहतील:बीड-शहागड-अंबडकडून येणारी वाहतूक: ही वाहतूक पारनेर फाटा (सुखसागर हॉटेल) येथून वळवण्यात आली आहे. ही वाहने आता किनगाव चौफुली - नानेगाव - बदनापूर - सेलगाव - ग्रेडर टी-पॉईंट मार्गे जालना शहरात प्रवेश करतील. जालना शहरातून अंबड-बीडकडे जाणारी वाहतूक: शहरातून बाहेर पडणारी वाहतूक ग्रेडर टी-पॉईंट - भोकरदन नाका - कन्हैयानगर - मंठा चौफुली मार्गे रोहणवाडी फाटा येथून वळवण्यात आली आहे. पुढे ही वाहने राणी उंचेगाव - सुतगिरणी - घनसावंगी फाटा मार्गे अंबड, बीड आणि शहागडकडे जातील.

**प्रशासनाचा इशारा**

रस्त्यावर वाहने उभी करून अडथळा निर्माण केल्यास किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. अंबड चौफुली परिसर आणि रॅलीचा मार्ग पूर्णपणे मोकळा



ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.उद्या प्रवासाला निघण्यापूर्वी वरील बदल लक्षात घ्या, अन्यथा तासनतास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागेल.

# जालन्यात विजयाचा गुलाल आणि पराभवाचा धक्का: कुठे जल्लोष, तर कुठे ॲम्बुलन्सची धाव!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** जालना विधानसभा निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया पार पडल्यानंतर आज जिल्ह्याचे राजकीय वातावरण कमालीचे तापलेले पाहायला मिळाले. निकालाचे कल स्पष्ट होताच 'कुठे खुशी, तर कुठे गम' असे चित्र पाहायला मिळाले. एका बाजूला विजयाचा अभूतपूर्व जल्लोष सुरू असताना, दुसऱ्या बाजूला काही समर्थकांना निकालाचा धक्का सहन न झाल्याने चिंतेचे वातावरण पसरले होते.



**पाच ब्रास गुलालाची उधळण: महावीर ढाका यांचा हायवा चर्चेत**

जालन्याच्या राजकीय इतिहासात आज गुलालाची उधळण एका वेगळ्याच उंचीवर गेल्याचे पाहायला मिळाले. महावीर ढाका यांनी विजयाचा जल्लोष करण्यासाठी चक्क हायवा ट्रक भरून ५ ब्रास गुलाल आणला होता. शहराच्या मुख्य चौकातून जेव्हा हा गुलालाने भरलेला हायवा निघाला, तेव्हा संपूर्ण परिसर गुलामी रंगात न्हाऊन निघाला होता. कार्यकर्त्यांच्या गराड्यात आणि ढोल-ताशांच्या गजरात झालेला हा जल्लोष शहरात मोठा चर्चेचा विषय ठरला आहे.विजयाचा जल्लोष एकीकडे सुरू असतानाच दुसरीकडे एक दुर्दैवी घटना घडली. निकालाची धाकधूक आणि त्यानंतर उद्भवलेल्या परिस्थितीमुळे पिंटू रत्नपारखी यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना हृदयविकाराचा (Attack) झटका आल्याचे समजताच कार्यकर्त्यांमध्ये मोठी खळबळ उडाली. त्यांना तातडीने ॲम्बुलन्स पाचारण करून रुग्णालयात हलवण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून, त्यांच्या प्रकृतीसाठी समर्थक प्रार्थना करत आहेत.

निवडणुक निकालाचे 'मिश्र' पडसाद

मतमोजणी केंद्राबाहेर सकाळी ८ वाजल्यापासूनच कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. जसा जसा निकालाचा कल समोर येत गेला, तसतसे समर्थकांचे चेहरे बदलत गेले. विजयी उमेदवारांच्या समर्थकांनी एकमेकांना पेढे भरवून आणि फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोष साजरा केला. मात्र, काही ठिकाणी पराभवामुळे शांतता आणि निराशेचे सावट पाहायला मिळाले.प्रशासनाकडून कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मात्र, जालन्यातील हा 'हायवा भरलेला गुलाल' आणि 'ॲम्बुलन्सची धाव' या दोन टोकाच्या घटनांची सध्या जिल्हाभरात चर्चा रंगली आहे.

## लासूर स्टेशन येथे कै. डॉ. बाबुराव पवार यांच्या स्मरणार्थ मोफत वाचनालयाचे उद्घाटन

लासूर स्टेशन (प्रतिनिधी) गंगापूर तालुक्यातील सावंगी ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच आणि विकासकामांचे आधारस्तंभ कै. डॉ. बाबुराव पवार यांच्या स्मृतीप्रत्यर्थ लासूर स्टेशन येथे मोफत सार्वजनिक वाचनालयाचे थाटात उद्घाटन करण्यात आले. डॉ. पवार यांनी सुमारे ३० ते ३५ वर्षे सरपंचपद भूषवून गावाच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले होते.

## मुंबईसह महाराष्ट्रात 'कमळ' फुलले; फडणवीसांनी फुंकले विजयाचे रणशिंग

**आत्ताच एक्सप्रेस/मुंबई/प्रतिनिधी/**हा विजय केवळ आमचा नाही, तर महाराष्ट्राच्या जनतेने सुशासन, विकास आणि पारदर्शकतेवर मारलेली ही मोहोर आहे. भावनिक राजकारणाला थारा न देता जनतेने विकासाच्या राजकारणाला साथ दिली आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना जोरदार प्रत्युत्तर देत विजयाचा हुंकार भरला.मुंबईसह राज्यभरातील महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने मिळवलेल्या घवघवीत यशानंतर, नरीमन पॉईंट येथील भाजपा प्रदेश कार्यालयात शुक्रवारी अभूतपूर्व जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.मुंबई महापालिकेसह राज्यातील इतर महत्त्वाच्या शहरांमध्ये भाजपा-महायुतीने विरोधकांचा पार धुव्वा उडवला आहे. या विजयाचे विश्लेषण करताना मुख्यमंत्री म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर जनतेने पुन्हा एकदा अढळ विश्वास दाखवला आहे. आम्ही विकासाचा अजेंडा घेऊन मैदानात उतरलो होतो आणि जनतेने त्याला भरभरून प्रतिसाद दिला. हा विजय महायुतीच्या पारदर्शक कारभाराची पावती आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.यावेळी मुख्यमंत्र्यांनी हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून विरोधकांना खडेबोल सुनावले. ते म्हणाले, भाजपाच्या कार्याचा आत्मा हिंदुत्व आहे आणि आम्हाला त्याचा सार्थ अभिमान आहे. पण आमचे हिंदुत्व संकुचित नाही. जो कोणी भारताच्या संस्कृतीचा मान राखतो, तो प्रत्येक जण आमचा आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे यांचा आशीर्वाद आमच्या पाठीशी होता आणि म्हणूनच हा ऐतिहासिक विजय शक्य झाला.प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी हा विजय पक्षाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांना समर्पित केला. वर्षानुवर्षे कार्यकर्त्यांनी पाहिलेले स्वप्न आज पूर्ण झाले आहे. त्याग आणि समर्पणाच्या जोरावर भाजपा आज क्रमांक एकचा पक्ष ठरला आहे, असे चव्हाण यांनी नमूद केले.प्रदेश कार्यालयाबाहेर ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण आणि फटाक्यांच्या आतषबाजीने परिसर दणाणून गेला होता.दिग्गजांची उपस्थिती: विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मंगलप्रभात लोढा, आशिष शेलार, पंकजा मुंडे, राधाकृष्ण विखे पाटील, अमित साटम यांच्यासह महायुतीचे सर्व प्रमुख नेते विजयाच्या जल्लोषात सहभागी झाले होते.विजयाचा उन्माद न करता मुख्यमंत्र्यांनी कार्यकर्त्यांना कानमंत्रही दिला. जनतेने प्रेम दिले आहे, आता आपली जबाबदारी वाढली आहे. प्रत्येक लोकप्रतिनिधीने निस्वार्थ भावनेने जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले.या विजयामुळे आगामी काळात राज्याच्या राजकारणात भाजपाची पकड अधिक घट्ट झाल्याचे स्पष्ट झाले असून, विरोधकांसमोर आता अस्तित्वाचे मोठे संकट उभे राहिले आहे.

## संक्षिप्त

### मध्य रेल्वेवर महिनाभर मोठा ब्लॉक, लोकलसह एक्सप्रेस विलंबाने; पनवेल, कर्जत, कल्याण... कुठे होणार परिणाम?

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर अर्थात, समर्पित माल वाहतूकमार्ग प्रकल्पाच्या मार्गात पनवेल ते कळंबोलीदरम्यान ओपन वेब गर्डरची उभारणी करण्यात येणार आहे. यासाठी मध्य रेल्वेने रविवार १८ जानेवारी ते १५ फेब्रुवारीदरम्यान पनवेल ते कळंबोलीदरम्यान अप आणि डाउन मार्गावर विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घोषित केला आहे.

डीएफसीसी प्रकल्पातील ओपन वेब गर्डर ११० मीटर लांबीचा आहे. त्याचे वजन १,५०० मेट्रिक टन असणार आहे. मध्यरात्रीच्या ब्लॉकमध्ये टप्याटप्याने गर्डर उभारणी पूर्ण करण्यात येणार आहे. ब्लॉक वेळेत १६ मेल-एक्स्प्रेसवर परिणाम होणार असून काही मेल-एक्स्प्रेस विलंबाने धावणार आहेत.

**जानेवारीमध्ये कोणत्या गाड्यांवर परिणाम? :** १८-१९ जानेवारी, २०२६ रोजी (रविवार/सोमवारची रात्र) मध्यरात्री ०१:२० - ०३:२०च्या दरम्यान गाडी क्रमांक २२१९३ दौंड-ग्वाल्हेर एक्सप्रेस कर्जत-कल्याण-वसई रोड मार्गे वळवण्यात येईल. तसेच, गाडी क्रमांक १२१३४ मंगळूर-सीएसएमटी एक्सप्रेस पनवेल येथे ०३:१४ ते ०३:२० दरम्यान थांबवण्यात येईल.

२५-२६ जानेवारी, २०२६ रोजी (रविवार/सोमवारची रात्र) ०१:२० - ०५:२० दरम्यान, गाडी क्रमांक २२१९३ दौंड-ग्वाल्हेर एक्सप्रेस कर्जत-कल्याण-वसई रोड मार्गे वळवण्यात येईल. त्याचबरोबर, गाडी क्रमांक १२१३४ मंगळूर-सीएसएमटी एक्सप्रेस सोमटाणे येथे (०२:५८-०५:२०) थांबवण्यात येईल.

शिवाय गाडी क्रमांक २०११२ मडगाव-सीएसएमटी कोकण कन्या एक्सप्रेस पनवेल येथे (०४:०२-०५:२०) थांबवण्यात येईल. ट्रेन ११०४ सावंतवाडी रोड-दादर तुतारी एक्सप्रेस आपटा येथे थांबवण्यात आली (०४:२५-०५:१५ वाजता). ट्रेन १२६२० मंगळूर-एलटीटी मुंबई मत्स्यगंधा एक्सप्रेस जिते येथे थांबवण्यात आली (०४:४१-०५:१० वाजता). ट्रेन १०१०३ सीएसएमटी-मडगाव मांडवी एक्सप्रेस सीएसएमटीहून ०८:२० वाजता सुटण्यासाठी पुनर्निर्धारित करण्यात आली आहे. ट्रेन १७३१७ हुबळी-दादर एक्सप्रेस १५-२० मिनिटे उशिरा पोहोचण्याची शक्यता आहे.

**फेब्रुवारीमध्ये सेवांवर परिणाम :** ३-४ फेब्रुवारी, २०२६ रोजी (मंगळवार/बुधवार रात्र) मध्यरात्री ०१:२० - ०४:२० वाजता ट्रेन १२१३४ मंगळूर-सीएसएमटी एक्सप्रेस सोमटाणे येथे थांबवण्यात येणार असून (०२:५८-०४:१० वाजता) ट्रेन २०११२ मडगाव-सीएसएमटी कोकण कन्या एक्सप्रेस पनवेल येथे थांबवण्यात येईल (०४:०२-०४:२० वाजता), तसेच १०-११ फेब्रुवारी, २०२६ (मंगळवार/बुधवार रात्री).

### शालेय विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य जनजागृती करा- जिल्हाधिकारी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** विद्यार्थ्यांमध्ये व त्यांच्या पालकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती होणे आवश्यक असून त्यासाठी महिला बालविकास, शिक्षण विभाग आणि आरोग्य विभाग यांनी संयुक्तपणे ही जनजागृती करावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.जिल्हा परिषदेच्या वेरुळ सभागृहात झालेल्या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, सहा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संजय मुळे, जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे, शिक्षणाधिकारी (प्राथ.) जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी (माध्य.) आश्विनी लाठकर तसेच जिल्ह्यातील तालुकास्तरीय, प्राथ आरोग्य केंद्र स्तरीय वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, शालेय मुलांमध्ये आरोग्य विषयक जनजागृती करणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्यांचे आरोग्य चांगले राहिल. त्यासाठी उत्तम दिनचर्या, वैयक्तिक स्वच्छता, आरोग्यदायी सवयी, व्यायाम, खेळ, झोप,पौष्टिक आहार याबाबत त्यांना ज्ञान देणे आवश्यक आहे. यासाठी आरोग्य यंत्रणेतील अधिकारी- कर्मचाऱ्यांनी वेळ द्यावा. शाळानिहाय कार्यक्रम आयोजीत करुन विद्यार्थ्यांमध्ये याबाबत जनजागृती करावी. त्यासाठी खाजगी डॉक्टर्सचाही सहभाग घ्यावा. आरोग्यक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी हा उपक्रम राबवावा,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिला.

## 'अमृत कौशल्य उद्यम वर्धन' प्रशिक्षण कार्यक्रम;लघु उद्योग सुरू करण्यासाठी मार्गदर्शन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** व्यवसाय वृद्धीसाठी कौशल्याधारित प्रशिक्षण व डिजिटल बाजारपेठेचे महत्त्व ओळखून महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने 'अमृत कौशल्य उद्यम वर्धन - लघु उद्योग प्रशिक्षण कार्यक्रम' राबविण्यात येत आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून नवउद्योजकांना स्वतःचा उद्योग उभारण्यासाठी आवश्यक असलेले सर्वंकष व व्यवहार्य मार्गदर्शन दिले जाणार आहे.'कौशल्यातून उद्योग आणि उद्योगातून स्वावलंबन' या संकल्पनेवर आधारित या प्रशिक्षण कार्यक्रमात उद्योग सुरू करण्यापासून ते उत्पादन विक्रीपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया सविस्तरपणे समजावून सांगण्यात येणार आहे. उद्योगासाठी आवश्यक कच्चा माल, ब्रँडिंग, ट्रेडमार्क नोंदणी, आर्थिक नियोजन, नफा-तोट्याचे गणित, तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ कसा घ्यायचा यावर विशेष भर देण्यात येणार आहे.या प्रशिक्षणाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'अमृत पेठ' या विक्री माध्यमाची सविस्तर माहिती देण्यात येणार असून, या माध्यमातून लघु उद्योगातील उत्पादने संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचविण्याची संधी मिळणार आहे. यामुळे स्थानिक पातळीवरील उद्योजकांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध होऊन त्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त होण्यास मदत होणार आहे.

अमृतच्या विविध योजनांचा लाभ खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना घेता येणार असून, ब्राह्मण, कोमटी, मारवाडी, ठाकूर, गुजराती, सिंधी, कायस्थ, जाट, बणिया, बंत्स, नायर, अय्यंगार, पाटीदार, बंगाली, पटेल, येलमार, त्यागी, सेनगुनथर, राजपुरोहित, नायडू,राजपूत, काणबी, कम्मा, भूमीहार, हिंदू नेपाळी, समाजघटकांतील वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असलेले नागरिक या प्रशिक्षणासाठी पात्र ठरणार आहेत.

स्वतःचा उद्योग सुरू करून आर्थिक स्वावलंबन साधू इच्छिणाऱ्या नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमृतच्या वतीने करण्यात आले आहे.

## जटवाडा येथे होनार पंचामृत अभिषेक महाप्रसाद

छत्रपती सभाजीनगर प्रतिनिधी - श्री.१००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे १८ जानेवारी रविवारी रोजी आर्यिका सौभाग्यमती माताजी याचा सानिध्यातमुलनायक श्री.संकटहर पार्श्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक व णमोकार भक्ती मंडळचा साग्रसगीतात अभिषेक करण्यात येणार आहे. यावेळी सर्व उपस्थित समाज बांधवांना सकाळी ११ते २ या वेळेस अशोक कुमार स्व राजकुमार शरदकुमार के अजितकुमार गगवाल परीवार वाकलावाला छत्रपती सभाजीनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे.अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा आरती करण्यात येणार आहे.

# सेवेतून भक्तीचा मार्ग : 'हिंद-दी-चादर'श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या शहीदी समागम कार्यक्रमात सेवेच्या माध्यमातून साक्षीदार होऊ या

भारतीय इतिहासात धर्म, मानवता, त्याग आणि बलिदान यांचे अद्वितीय प्रतीक म्हणून श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांचे नाव अजरामर आहे. धर्मस्वातंत्र्य, मानवमूल्ये आणि सत्यासाठी प्राणार्पण करणारे ते 'हिंद-दी-चादर' म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या महान शहिदीच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड शहरात २४ व २५ जानेवारी रोजी एक भव्य, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

हा भव्य समागम असर्जन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुमारे ५३ एकर विस्तीर्ण मैदानावर संपन्न होणार असून, देश-विदेशातून जवळपास १० लाखांहून अधिक भाविक या पवित्र समागम कार्यक्रमासाठी नांदेडमध्ये दाखल होणार आहेत. हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, सेवा, समानता आणि मानवतेचा महासंगम ठरणार आहे.

**नऊ समाजांचा ऐतिहासिक सहभाग**

या ऐतिहासिक शहीदी समागमाचे आयोजन नऊ समाजांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. राज्य शासनाचा अल्पसंख्याक विभाग, 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेगबहादूर साहिबजी ३५० वी शहीदी समागम समिती तसेच सीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज या सर्व समाजांनी एकत्र येत एकतेचा आणि समतेचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. ही संयुक्त रचना गुरूंच्या विचारांची जिवंत साक्ष आहे. 'सर्व धर्म समान, सर्व मानव समान' हा संदेश या आयोजनातून ठळकपणे अधोरेखित होतो.

**मुख्य मंडप, अनवाणी चालण्याची परंपरा आणि श्रद्धेचा सन्मान :** कार्यक्रमस्थळी उभारण्यात येणाऱ्या मुख्य मंडपात दोन्ही दिवस श्री गुरु ग्रंथसाहिब विराजमान राहणार आहे. गुरूंच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी येणारे सर्व भाविक, मान्यवर, पदाधिकारी व अतिथी कार्यक्रमस्थळी अनवाणी चालणार आहेत.

ही परंपरा केवळ धार्मिक शिस्त नसून अहंकार त्याग, नम्रता आणि गुरूचरणी समर्पणाची भावना व्यक्त करणारी आहे. लाखो भाविक अनवाणी चालत गुरूच्या दर्शनासाठी येणार, हे दृश्यच सेवेतून भक्तीचा खरा अर्थ उलगडून दाखवणारे ठरणार आहे. तसेच संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या जन्मगाव नरसी नामदेव येथून वारकरी दिंड्या पायी चालत नांदेड येथे समागम स्थळी येणार आहे.

**श्रमदानातून उभी राहणारी सेवा संस्कृती**

या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा एक अत्यंत प्रेरणादायी प्रसंग म्हणजे नुकतेच पार पडलेले भव्य श्रमदान. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत कार्यक्रमस्थळी श्रमदान करण्यात आले. मैदानावरील खडे उचलणे, जमिनीची स्वच्छता करणे, चालण्यासाठी सुरक्षित व्यवस्था करणे ही सर्व कामे सेवाभावाने करण्यात आली. प्रशासन, विद्यार्थी, स्वयंसेवक आणि भाविकांनी एकत्र येऊन केलेले हे श्रमदान सेवेतून भक्तीचा प्रत्यक्ष अनुभव देणारे ठरले. गुरूंच्या शिकवणीनुसार सेवा हीच खरी साधना असल्याचा संदेश या उपक्रमातून समाजापर्यंत पोहोचला.

**लंगर : समानतेचा आणि मानवतेचा महासागर :** या भव्य शहीदी समागमात भाविकांच्या सोयीसाठी १२ भव्य लंगर उभारण्यात येणार आहेत. प्रत्येक लंगरमध्ये एकावेळी सुमारे ३,००० भाविक बसून भोजन करू शकतील, अशी उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे. २४ व २५ जानेवारी रोजी हे लंगर सकाळी ८ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत अखंड सुरू राहणार आहेत.

लंगर म्हणजे केवळ अन्नसेवा नाही, तर समानतेची शिकवण आहे. येथे जात, धर्म, भाषा, देश, श्रीमंती-गरिबी यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वजण एकाच पंक्तीत बसून गुरूचा प्रसाद स्वीकारणार आहेत. हा दृश्य अनुभव गुरू नानक देवजींच्या 'सर्व मानव समान आहेत' या विचाराचा साक्षात्कार घडवणारा असेल.

**विनामूल्य सेवा स्टॉल**

कार्यक्रमस्थळाच्या चारही बाजूंनी दोन किलोमीटरपर्यंतच्या परिसरात चहा, पाणी, नाश्ता, फळे यांचे विनामूल्य सेवा स्टॉल उभारण्यात येणार आहेत. ही व्यवस्था लाखो भाविकांच्या सोयीसाठी असून, निःस्वार्थ सेवेचा सर्वोच्च आदर्श समाजासमोर ठेवणारी आहे. सेवा करताना कोणताही मोबदला, मान-सन्मान किंवा प्रसिद्धी अपेक्षित नसून, केवळ गुरूंच्या नावाने सेवा करण्याचा आनंद स्वयंसेवक अनुभवणार आहेत.

**जुताघर : नम्रतेचा आणि अहंकार त्यागाचा संस्कार**

कार्यक्रमस्थळी ८ प्रवेशद्वारांवर ८ जुताघरे उभारण्यात येणार असून, गरजेनुसार त्यांची संख्या वाढवण्यात येणार आहे. लाखो भाविकांच्या पादत्राणांची काळजी घेणे ही एक मोठी जबाबदारी असून, ती सेवा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडली जाणार आहे. जुताघर सेवा म्हणजे अहंकाराचा त्याग आणि नम्रतेची साधना. गुरूच्या दरबारात प्रवेश करताना पादत्राणे बाहेर ठेवणे म्हणजे बाह्य वैभव आणि गर्व दारातच ठेवणे होय. ही सेवा माणसाला अंतर्मुख करते आणि समानतेचा खरा अर्थ शिकवते.

**गतका, परंपरा आणि शौर्याचे दर्शन**

या शहीदी समागमात शीख धर्मीयांचा पारंपरिक युद्धकला प्रकार 'गतका' सादर करण्यात येणार आहे. यामध्ये पारंपरिक शस्त्रांचे प्रदर्शन, शौर्य, शिस्त आणि युद्धकलेचे प्रात्यक्षिक पाहायला मिळणार आहे. तसेच नऊ समाजांच्या वतीने पारंपरिक कीर्तन, कथा आणि धार्मिक प्रवचनांचे आयोजन करण्यात येणार असून, त्यातून गुरूंच्या जीवनकार्याचा आणि बलिदानाचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे.

या समागमासाठी दिल्ली अमृतसर, चंदीगड, मुंबई, हैदराबाद येथून मोफत रेल्वे सेवा राहणार असून तसेच विशेष विमानसेवा दोन्ही दिवस असणार आहे. तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी दहा हजार भाविकांच्या निवासासाठी सर्व सुविधायुक्त आदर्श टेन्ट सिटी उभी करण्यात येणार आहेत

**हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी : श्रद्धेचा अभिषेक**

या ऐतिहासिक कार्यक्रमात हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. गुरूंच्या प्रतिकृतीवर आणि भाविकांवर होणारी ही पुष्पवृष्टी म्हणजे श्रद्धेचा, सन्मानाचा आणि कृतज्ञतेचा अभिषेक असेल.

**सेवेतून इतिहासाचे साक्षीदार होऊ या**

नांदेड येथे होणारा हा ३५० वा शहीदी समागम म्हणजे केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून, सेवा, समानता, बलिदान आणि मानवतेचा महासोहळा आहे. 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांचा संदेश आजही तितकाच जिवंत असून, तो या भव्य आयोजनातून संपूर्ण जगाला पुन्हा एकदा दिशा देणार आहे. तसेच या कार्यक्रमासाठी विविध राज्यांचे मुख्यमंत्री, बागेश्वरचे आचार्य, महंत आदी उपस्थित राहणार आहेत.

चला तर मग, या गौरवशाली ऐतिहासिक कार्यक्रमाचे साक्षीदार बनू या,सेवेत सहभागी होऊ या आणि गुरूंच्या चरणी आपली सेवा अर्पण करण्यासाठी सज्ज होऊया.

**अलका पाटील,** उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड

# महाराष्ट्राचा विवेकी आवाज; प्रा डॉ एन डी पाटील



फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज चौथा स्मृतिदिन. चार वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे १७ जानेवारी २०२२ रोजी प्रा डॉ एन डी पाटील यांचे निधन झाले होते. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ( १९६२ ) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्षे सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

– **श्याम ठाणेदार,** दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५

# नायलॉन मांजा बंदीची कठोर अंमलबजावणी करा, जीवघेण्या उत्सवांना आळा घाला

मुंबई उच्च न्यायालयाने नायलॉन मांजाच्या बेकायदेशीर विक्रीवर कठोर आणि गंभीर कारवाई करण्यात अपयशी ठरल्याबद्दल महाराष्ट्र सरकारवर तीव्र ताशेरे ओढले आहेत. न्यायालयाने म्हटले आहे की, नायलॉन मांजावर 'स्पष्ट बंदी' असूनही, तो सर्रासपणे उपलब्ध आहे आणि मोठ्या प्रमाणावर वापरला जात आहे, ज्यामुळे नागरिक आणि पक्षी जखमी होत आहेत. न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती हितेंद्र वेणेगावकर यांच्या खंडपीठाने नायलॉन मांजाच्या धोक्याविरुद्ध राज्याची कारवाई 'प्रासंगिक' आणि घटनात्मक जबाबदाऱ्यांशी विसंगत असल्याचे नमूद केले. या महत्त्वपूर्ण निर्णयाचे स्वागत करताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धनावत यांनी प्रशासनाला, विशेषतः जालना जिल्हा प्रशासनाला अधिक सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

ड. धनावत यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आणि स्वागतार्ह आहे. न्यायालयाने शासनाच्या निष्क्रियतेवर जे बोट ठेवले आहे, ते वास्तव आहे. आता केवळ कागदोपत्री कारवाई करून चालणार नाही, तर या निर्णयाची प्रत्यक्ष जमिनीवर कठोर अंमलबजावणी होणे अत्यावश्यक आहे. जालना जिल्हा हा जैन संत गुरु गणेश यांच्या नावाने ओळखला जातो,



जिथे अहिंसेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. अशा पवित्र भूमीत, पतंगबाजीच्या नावाखाली होणारी जीवघेणी स्पर्धा आणि त्यामुळे पक्ष्यांचे जाणारे बळी हे अत्यंत दुर्दैवी आहे. प्रशासनाने आतापासूनच सतर्क होऊन नायलॉन मांजाची विक्री आणि साठवणूक करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी. नागरिकांनी देखील जबाबदारी ओळखून अशा धोकादायक उत्सवांपासून दूर राहावे, जेणेकरून निष्पाप पक्षी आणि मानवांचे प्राण वाचवता येतील.

उच्च न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, जेव्हा एखादी गंभीर घटना घडते किंवा प्रकरण सुनावणीसाठी येते, तेव्हा सरकारकडून आश्वासने दिली जातात, धाडी टाकल्या जातात आणि विशेष मोहिमा राबवल्या जातात. मात्र, एकदा प्रसिद्धी कमी झाली की अंमलबजावणी पुन्हा थंडावते. ही प्रक्रिया केवळ एक उपचार असून राज्याच्या घटनात्मक जबाबदाऱ्यांच्या विरोधात आहे. न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले की, नायलॉन मांजामुळे होणारा धोका केवळ मानवांपुरता मर्यादित नाही, तर तो पक्षी आणि इतर प्राण्यांसाठीही जीवघेणा ठरतो, ज्यांचे संरक्षण करणे हे कलम ४८-अ आणि ५१-अ(जी) अंतर्गत राज्याचे कर्तव्य आहे. केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई करण्याऐवजी उत्पादक, मोठे पुरवठादार, घाऊक विक्रेते आणि या अवैध व्यापारात गुंतलेल्या संघटित टोळ्यांवर कारवाई करण्याचे कोणतेही गंभीर प्रयत्न दिसून येत नाहीत, असेही न्यायालयाने नमूद केले.

या समस्येवर तोडगा काढण्यासाठी, न्यायालयाने पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली एका 'विशेष कृती दलाची' स्थापना करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, सर्व पोलीस आयुक्त आणि अधीक्षकांना पुरवठा साखळीच्या विरोधात सातत्यपूर्ण पाळत ठेवण्याचे आणि गुप्त माहितीवर आधारित कारवाया करण्याचे निर्देश दिले आहेत. याशिवाय, सर्व महानगरपालिका आणि स्थानिक प्राधिकरणांना दुकाने, गोदामे आणि बाजारांची सतत तपासणी करून प्रतिबंधित मांजा आढळल्यास केवळ जप्ती न करता, परवाने रद्द करणे, जागा सील करणे आणि संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने पीडित तीन व्यक्तींना प्रत्येकी २ लाख रुपयांची भरपाई चार आठवड्यांत देण्याचे आणि भविष्यातील अशा घटनांसाठी एक स्वतंत्र भरपाई निधी स्थापन करण्याचे निर्देशही राज्य सरकारला दिले आहेत.

**– ड. महेश एस. धनावत**

# त्याग आणि बलिदानाचे मूर्तिमंत रूप – श्री गुरु तेग बहादूर साहिब जी

श्री. गुरु तेग बहादूरजी हे शीख समुदायाचे गुरु होते, ज्यांची शहादत केवळ एका धर्म किंवा समुदायापुरती मर्यादित नसून, संपूर्ण मानवतेसाठी त्याग, धैर्य आणि धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक आहे. जेव्हा एका आध्यात्मिक गुरूंनी अन्याय, अत्याचार आणि धार्मिक दडपशाहीसमोर झुकण्याऐवजी आपले शीश अर्पण केले; मात्र आपल्या तत्त्वांशी कोणतीही तडजोड केली नाही. त्यामुळे त्यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आपल्याला त्या ऐतिहासिक क्षणाची आठवण होणे साहजिकच आहे. नांदेड येथे होत असलेल्या २४ व २५ जानेवारी २०२६ विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

श्री. गुरु तेग बहादूर साहिबजी केवळ शीख समुदायातीलच नव्हे, तर भारतीय उपखंडाच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक इतिहासातील एक महान विभूती आहेत. त्यांचे जीवन धैर्य, त्याग, करुणा आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या सर्वोच्च आदर्शांचे प्रतीक आहेत. त्यांचा जन्म इसवी सन १ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे झाला. ते सहावे शीख गुरु, गुरु हरगोबिंद साहिबजी यांचे धाकटे पुत्र होते. बालपणापासूनच त्यांचा स्वभाव गंभीर, शांत आणि आत्मचिंतनशील होता. इतर मुले खेळात रमलेली असताना गुरु तेग बहादूर साहिबजी एकांतात बसून ईश्वरचिंतन व साधनेत आनंद अनुभवत असत. त्यामुळेच पुढे त्यांचे जीवन बाह्य वैभवापेक्षा अंतःशक्ती आणि नैतिक दृढतेचे उदाहरण ठरले.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजींनी बालपणी शस्त्र व शास्त्र या दोन्हींचे शिक्षण घेतले. युद्धकौशल्य, घोडेस्वारी आणि तलवारबाजी यात त्यांनी प्रावीण्य मिळवले; मात्र कधीही हिंसा किंवा सत्तेच्या लालसेकडे त्यांचे मन वळले नाही. धर्म व मानवतेच्या रक्षणासाठीच शस्त्रांचा उपयोग अर्थपूर्ण असतो, हे ते जाणून होते. तरुणपणी त्यांनी दीर्घकाळ ध्यान व तपस्येचे जीवन स्वीकारले. त्यांच्या या वैराग्य व त्यागामुळेच त्यांना 'त्याग मल' असेही म्हटले गेले. हा त्याग संसारापासून पलायन नव्हता, तर अन्यायापुढे कधीही न झुकणारी आत्मशक्ती निर्माण करण्याचा मार्ग होता.

इसवी सन १६६४ मध्ये श्री गुरु तेग बहादूर साहिबजी शिखांचे नववे गुरु झाले. त्या काळात भारतातील सामाजिक व धार्मिक वातावरण अत्यंत तणावपूर्ण होते. तत्कालिन शासकाच्या धोरणांमुळे धार्मिक असहिष्णूता वाढत होती. अनेक ठिकाणी जबरदस्तीने धर्मांतर, मंदिरांचा विध्वंस आणि धार्मिक आस्थांवर कठोर निर्बंध लादले जात होते. अशा परिस्थितीत श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचे गुरु-पद स्वीकारणे ही केवळ आध्यात्मिक जबाबदारी नव्हे, तर एक मोठे ऐतिहासिक आव्हान होते.

गुरु तेग बहादूर साहिबजींनी आपल्या गुरु-कालावधीत व्यापक प्रवास केला. पंजाबपासून बंगाल, बिहार, आसाम तसेच पूर्व भारतातील अनेक भागांत त्यांनी भ्रमण केले. या यात्रांचा उद्देश केवळ शीख पंथाचा विस्तार नव्हता, तर लोकांमध्ये निर्भयता, आत्मसन्मान आणि ईश्वरावरील खरी श्रद्धा जागवणे हाच होता. ईश्वर एकच आहे आणि सर्व मानव समान आहेत, हे ते शिकवत. जात, धर्माच्या पलीकडे जाऊन सत्य, करुणा आणि प्रेमाचा मार्ग स्वीकारणे हीच खरी भक्ती आहे, असा त्यांचा संदेश होता.

गुरु तेग बहादूरजींची वाणी अत्यंत गूढ व तात्त्विक आहे. त्यांच्या रचना गुरु ग्रंथ साहिबमध्ये संकलित असून त्यामध्ये जीवनाची नश्वरता, मायेची असारता आणि ईश्वरभक्तीचा सखोल संदेश आढळतो. सुख-दुःख, मान-अपमान, भय-लोभ यापलीकडे जो जातो, तोच खऱ्या अर्थाने मुक्त आहे, असे ते सांगतात. आजही त्यांची वाणी माणसाला अंतःकरणाने मजबूत बनण्याची आणि बाह्य परिस्थितींनी विचलित न



होण्याची प्रेरणा देते.

गुरु तेग बहादूरजींचे सर्वात महान व ऐतिहासिक योगदान म्हणजे धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी दिलेले त्यांचे सर्वोच्च बलिदान होय. काश्मीरमधील पंडितांवर जबरदस्तीने दुसरा धर्म स्वीकारण्याचा दबाव टाकला जात होता. आपली श्रद्धा, संस्कृती आणि जीवनपद्धती वाचवण्यासाठी ते व्याकुळ झाले होते. जेव्हा ते गुरु तेग बहादूर साहिबजींकडे गेले, तेव्हा गुरुजींनी ही वेदना केवळ एका समुदायाची समस्या मानली नाही, तर तिला संपूर्ण मानवतेच्या व धर्मस्वातंत्र्याच्या प्रश्नाशी जोडले.

कोणत्याही व्यक्तीला आपल्या श्रद्धेनुसार जगण्याचा अधिकार आहे आणि कोणतीही सत्ता हा अधिकार हिरावून घेऊ शकत नाही, असे श्री गुरु तेग बहादूरजींनी ठामपणे सांगितले. भीषण परिणामांची जाणीव असूनही त्यांनी काश्मिरी पंडितांच्या रक्षणाचा संकल्प केला. हा त्यांच्या जीवनातील सर्वात धैर्यशील आणि ऐतिहासिक निर्णय होता.

ही बाब तत्कालिन शासकांच्या दरबारापर्यंत पोहोचताच श्री गुरु तेग बहादूरजींना दिल्लीला बोलावण्यात आले. तत्कालिन शासकांचा धर्म स्वीकारल्यास त्यांचे प्राण वाचतील आणि मान-सन्मान व सुविधा मिळतील, असे सांगण्यात आले. पर्यायाने चमत्कार दाखवण्याची मागणीही करण्यात आली. मात्र गुरुजींनी दोन्ही प्रस्ताव नाकारले. धर्मांतर म्हणजे आत्म्याशी द्रोह, तर चमत्कार दाखवणे म्हणजे ईश्वराच्या नावाचा अपमान, असे त्यांचे मत होते. जीवनाची किंमत मोजावी लागली तरी सत्य आणि विवेकाचा मार्ग स्वीकारण्याचा त्यांनी निर्धार केला.

इसवी सन १६७५ मध्ये दिल्लीच्या चांदणी चौकात गुरु तेग बहादूरजींना सार्वजनिकरीत्या शहीद करण्यात आले. त्यांच्या समोरच त्यांचे तीन परम शिष्य भाई मती दास, भाई सती दास आणि भाई दयाल दास यांचा अमानुष छळ करण्यात आला, तरीही गुरु तेग बहादूरजी ठाम राहिले. त्यांनी मृत्यू स्वीकारला; पण आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. भारतीय इतिहासात धार्मिक स्वातंत्र्यासाठी दिलेले हे एक अद्वितीय व अनुपम बलिदान आहे.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजींच्या शहादतीचा दूरगामी परिणाम झाला. या बलिदानाने हे स्पष्ट केले की भारताची आत्मा सहिष्णुता, विविधता आणि धार्मिक स्वातंत्र्यात दडलेली आहे. त्यांचे पुत्र गुरु गोबिंद सिंहजींनी या शहादतीतून प्रेरणा घेऊन खालसा पंथाची स्थापना केली आणि अन्याय, अत्याचार व असत्याविरुद्ध संघटित संघर्षाचा मार्ग खुला केला. अशा प्रकारे गुरु तेग बहादूरजींचा त्याग येणाऱ्या पिढ्यांसाठी धैर्य आणि आत्मसन्मानाचा शाश्वत स्रोत ठरला.

श्री गुरु तेग बहादूरजींचे जीवन हेही शिकवते की खरा धर्म केवळ आपल्या अनुयायांच्या रक्षणापुरता मर्यादित नसतो. त्यांनी आपले प्राण शीखांसाठी नव्हे, तर हिंदू पंडितांच्या धार्मिक स्वातंत्र्यासाठी अर्पण केले. यामुळे ते संकुचित धार्मिक सीमांपलीकडे जाऊन एक सार्वत्रिक मानवतावादी व्यक्तिमत्त्व ठरतात. मानवता संकटात असताना खरे संत व महापुरुष वैयक्तिक हितांपेक्षा समाजाच्या हितासाठी उभे राहतात, त्यांचे जीवन हा सक्षम पुरावा होय.

आजच्या काळात, जेव्हा जगातील अनेक भागांत धार्मिक असहिष्णुता, हिंसा आणि द्वेष वाढत आहेत, तेव्हा श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचा संदेश अधिकच सुसंगत ठरतो. भीतीसमोर झुकणे सोपे असते; पण सत्यासाठी उभे राहणे हेच खरे धैर्य आहे, हे त्यांचे जीवन शिकवते. आत्मबल आणि नैतिक दृढता कोणत्याही सत्तेपेक्षा अधिक शक्तिशाली असते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले.

इतिहास केवळ विजेत्यांनी नव्हे, तर सत्य, धर्म आणि मानवतेसाठी प्राण अर्पण करणाऱ्या शहीदांनी घडतो, हाच संदेश गुरु तेग बहादूरजींचे जीवन व बलिदानातून आपल्याला मिळतो. अंधःकारातही मानवतेला प्रकाशाचा मार्ग दाखवला. धर्माचे रक्षण तलवारीने नव्हे, तर धैर्य, करुणा आणि सत्यनिष्ठेने होते, त्यामुळे श्री. गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे नाव भारतीय उपखंडात सदैव अमर दीपसारखे प्रज्ज्वलित राहील...

**(डॉ. अमरजीत कौंके हे पंजाबी व हिंदी भाषेतील प्रख्यात लेखक असून त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत.)**

**संपर्क : ९८१४२३१६९८ पटियाला, पंजाब**

## संक्षिप्त

## उपाध्याय विरजन सागर महाराज यांचे यांचे नमोकार तीर्थाकडे विहार



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** देशमुख नगर येथील ऐतिहासिक चातुर्मास व सात दिवस योग साधना शिवीराची सांगता झाल्यानंतर उपाध्याय वीरजनसागर महाराज यांचे देशमुख नगर छावणी मार्गाने छत्रपती नाशिक हायवेवरील मनोज फुलचंद दगडा याचा फार्महाऊसवर उपाध्याय सघाचे यांचे आगमन झाले सर्वप्रथम भगवंतांच्या पंचामृत अभिषेक करण्यात आला तर नंतर शांती मंत्राचे वाचन उपाध्याय विरजन सागर महाराज यांनी केले तसेच यांची यावेळी आहारचर्यी संपन्न झाली व विशेष प्रवचन संपन्न झाले यावेळेस फुलचंद मनोज रेखा रितू उमंग तरंग दगडा परिवारा उपाध्याय विरजनसागर महाराज याचे पाद्पुजा केले यावेळी गुरुदेव यानी सागितलं की ,धर्म प्रभावना बरोबरच आत्मकल्याण मोक्ष कल्याण हेच ध्येय असल्याचे सांगितले. संघ,स्वाध्याय, साधना आणि समाधी हाच आपला मूलधर्म आहे असे उपस्थितीना प्रवचन देताना बोलले. यावेळेस महिलांनी डोक्यावर कलश घेऊन जयघोश करत भव्य मिरवणुकीने स्वागत केले. तसेच यावेळी उपस्थित भाविकांना महाप्रसाद देण्यात आला नमोकार तीर्थ येथे आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक महोत्सवात उपस्थित राहण्यासाठी उपाध्याय विरजन सागर महाराजांचे विहार झाले आहे यावेळी सावन चुडीवाल सोनु दगडा नरेंद्र अजमेरा सपना चूडीवाल आशा चूडीवाल निकीता चुडीवाल अमीत गगवाल निरज बडजाते जयेश बडजाते चंद्रप्रकाश मत्री नंदु अनर्थ जितेंद्र गगवाल सोमनाथ सोमासे नदु पाटील आदीं उपस्थित होते अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली.

## चैतन्य दिंडे याची विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये उल्लेखनीय कामगिरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**बदनापूर / प्रतिनिधी/** यशाची परंपरा कायम राखून याही वर्षी चैतन्य सुधीर दिंडे याने विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्णपदकपटकावले आहे. गतवर्षीप्रमाणेच याही वर्षी त्याने उत्कृष्ट यश संपादन करत दुसर्या टप्प्यासाठी पात्रता मिळवली आहे.



होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा ही इयत्ता सहावी व नववीच्या

विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली जाते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक

दृष्टिकोन विकसित करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. या

परीक्षेमध्ये गणित व विज्ञान विषयातील मूलभूत संकल्पनांवर विचारले जातात तसेच विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक कौशल्येही तपासली

जातात. निवडक विद्यार्थ्यांना पुढील टप्प्यात सहभागी होण्याची संधी दिली जाते. या स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात चैतन्य दिंडे याने यश संपादन करून प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्रता मिळवली आहे. बालवयात त्याने असे यश मिळवून एक आदर्श निर्माण केला आहे. चैतन्य हा बदनापूर येथील 'पाथ्रीकर कॅम्पस' येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाचे प्रमुख डॉ. सुधीर दिंडे यांचा चिरंजीव आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल त्याचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. देवेश पाथ्रीकर यांच्यावतीने विशेष कौतुक करण्यात आले.कुटुंबीय, शिक्षक, नातेवाईक तसेच मित्रपरिवाराकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## प्रगती विद्यालयात भूगोल दिन उत्साह साजरा



**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/ प्रतिनिधी/** अल्पावधीत नावारूपाला आलेले प्रगती विद्यालय बालेपीर बीड येथे हमेशा विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. आमचे मार्गदर्शक संस्थापक आदरणीय शिक्षण महर्षी सहकार महर्षी श्री. रामकृष्णजी बांगर साहेब यांच्या कल्पनेतून नावारूपाला आलेला प्रगती विद्यालयाचा वृक्ष मोठा होत चाललेला आहे.त्याचाच एक भाग म्हणून शाळेत भूगोल दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला.त्याप्रसंगी प्रमुख अतिथी जनता विद्यालयाचे मुख्याध्यापक आदरणीय दिलीपरावजी कंठाळे सर व कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय गोपाळघरे यांनी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. अनेक विद्यार्थ्यांनी भूगोल दिनानिमित्त मॉडेल बनवून आणले होते. त्यामध्ये कु. वनवे कैवल्य, कु. डोंगर अक्षरा व कु. मोराळे आर्या या विद्यार्थिनींनी केंद्रीय ज्वालामुखीचा उद्रेक दाखवला.पठाण आतिफ या विद्यार्थ्याने सोलर पॅनल व पवन ऊर्जा हा प्रकल्प सादर केला.आघाव साहिल, वनवे श्रेयस व आरेकर अथर्व या विद्यार्थ्यांनी सूर्यग्रहण आपल्या मॉडेल मधून दाखवले.सानप सायली व मिसाळ यशश्री या विद्यार्थिनींनी हवेचे थर हे थर्माकोलच्या प्रतिकृतीतून दाखवून दिले. कार्यक्रमाची प्रस्तावना आदरणीय वाघवाले सर यांनी केली व अनेक मुलांनी भाषण, कविता सादर केल्या व आदरणीय प्रमुख अतिथी श्री. दिलीपरावजी कंठाळे सर यांनी मार्गदर्शन केले.मकर संक्रांति मुळे तिळगुळ विद्यार्थ्यांना देऊन कार्यक्रम संपन्न झाला.याप्रसंगी प्रगती विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी भूगोल दिनानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सानप एस. यु. सर यांनी केले.आभारप्रदर्शन शेख यांनी केले. व अतिशय मोठ्या उत्साहात कार्यक्रम संपन्न झाला.यातून विद्यार्थ्यांना पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मार्गदर्शन मिळाले.

# वैजापूरच्या उपनगराध्यक्षपदी राष्ट्रवादीचे रियाज अकिल शेख; नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशींनी पाळला शब्द

**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर (प्रतिनिधी /सुयोग वाणी)** वैजापूर नगर परिषदेच्या राजकारणात शुक्रवारी मोठ्या घडामोडी पाहायला मिळाल्या. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या 'वैजापूर शहर विकास आघाडी'चे उमेदवार शेख रियाज अकिल उर्फ (गब्बू शेठ) यांची उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीसोबतच स्वीकृत सदस्य म्हणून शिवसेनेचे संजय बोरनारे, तर भाजपकडून प्रकाश चव्हाण आणि प्रशांत कंगले यांची वर्णी लागली आहे.

निवडीचा घटनाक्रम आणि राजकीय समीकरणे

नगर परिषद निवडणुकीच्या वेळी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये युतीची चर्चा झाली होती. त्यावेळी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांनी राष्ट्रवादीला उपनगराध्यक्ष पद देण्याचे आश्वासन दिले होते. त्या शब्दाला जागत राष्ट्रवादीचे रियाज शेख यांना संधी देण्यात आली.

**सूचक व अनुमोदकः** रियाज शेख यांच्या नावासाठी राष्ट्रवादीच्या नगरसेविका सुवर्णा ठोंबरे यांनी सूचक म्हणून स्वाक्षरी केली, तर नगरसेविका शेख सुमैय्या सोहेल यांनी अनुमोदन दिले.

**निवडणूक प्रक्रियाः** मुख्याधिकारी भागवत बिघोत यांच्या उपस्थितीत सकाळी १० ते १२ या वेळेत ही प्रक्रिया पार पडली. यावेळी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी व सर्व नगरसेवक उपस्थित होते.

**निवडणुकीतील 'ट्विस्ट' आणि विशाल संचेतींचा अर्ज**

उपनगराध्यक्ष पदाची निवड बिनविरोध होईल अशी चर्चा असतानाच, भाजपतर्फे वि विशाल जीवनलाल संचेती यांनी अचानक अर्ज दाखल केल्याने खळबळ माजली होती. त्यांना नगरसेविका






मोनाली खैरे यांनी सूचित केले तर राजेश गायकवाड यांनी अनुमोदन दिले होते. मात्र, संचेती यांच्याकडे 'वैजापूर शहर विकास आघाडी'ची अधिकृत शिफारस नसल्याने त्यांचा अर्ज अवैध ठरवण्यात आला, ज्यामुळे रियाज शेख यांचा मार्ग मोकळा झाला.

स्वीकृत सदस्यपदी तिघांची वर्णी

नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्यपदासाठी प्रशासनाकडून तीन नावांची घोषणा करण्यात आली:

संजय नानासाहेब बोरनारे (शिवसेना),प्रकाश पंढरीनाथ चव्हाण (भाजप - शहर विकास आघाडी),प्रशांत प्रभाकरराव कंगले (भाजप - शहर विकास आघाडी) या सदस्यांच्या अर्जांची छाननी करून त्यांची अहर्ता तपासल्यानंतर प्रशासनाने त्यांची निवड जाहीर केली.

दिलेला शब्द पाळला - अकिल शेख

निवडीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना माजी उपनगराध्यक्ष हाजी अकिल शेख यांनी समाधान व्यक्त केले. ते म्हणाले की, आमदार सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादीने भाजपला साथ दिली होती. नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांनी उपनगराध्यक्ष पदाबाबत दिलेला शब्द आज पाळला आहे.या निवडीमुळे वैजापूर नगर परिषदेत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसची पकड अधिक मजबूत झाल्याचे चित्र दिसत आहे.

## बोटावरची मतदान केल्याची शाई दाखवा अन मोफत दाढी, कटिंग मिळवा माणुसकी सलुन..

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री /प्रतिनिधी/** मतदानासाठी नागरिकांनी बाहेर पडावे व मतदान १००% व्हावे,याकरिता सुमित पंडित ची धडपड छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकाची निवडणुक होत आहे या साठी काल दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान झाला.

आज मतदानाचा निकाल लागेला .

मतदानाची टक्केवारी वाढावी या करीता सुमित पंडित गेल्या ८ दिवसांपासून चार्ली चाप्लीन च्या वेशभुषा करुन मतदान १००% व्हावे या करिता जनजागृती करित आहे. आता शेवटच्या मतदानाच्या दिवशी त्याने अनोखी शक्कल लढवली होती. लोकांनी मतदानासाठी बाहेर पडावं,याकरिता त्याने आपल्या माणुसकी सलुन,सईदा कॉलनी सारा वैभव,जटवाडा रोड येथे ३३ मतदात्यांची दाढी कटिंग व १८ महिलांचा शाल,श्रीफळ आणि प्रशस्तिपत्र देवुन समाजसेविका पुजा पंडित यांनी सन्मानित केले. सुमित शासनाच्या खांद्याला खांदा लावून जनजागृतीचे कार्य अनेक वर्षापासून करीत आहे.त्याने या आधी सुद्धा मुलीचा जन्मदर वाढावा यासाठी मुलगी झाली कि पित्यांची दाढी कटिग मोफत, वृक्ष लागवड करणाऱ्या दात्यांची सलून



सेवा मोफत, टॉयलेट झाडणाऱ्या दात्यांची सलून सेवा मोफत, सैनिकांची चांदी च्या वस्ताऱ्याने मोफत सलुन सेवा अश्या विविध योजना सुमित राबवतो. विशेष म्हणजे त्याच्या माणुसकी सलून मध्ये वाचनालय देखील आहे.तरी संभाजीनगर शहरातील जास्तीत जास्त मतदात्यांनी मतदान करून या योजनेचा लाभ घ्यावा असे आव्हान सुमित पंडित यांनी नागरिकांना केले होते.

नागरिकांनी या योजनेचे कौतुक करीत ह्या योजनेचा लाभ घेतला माणुसकी सलुन मध्ये सकाळी ७ वाजल्या पासुन सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान करुन आल्यावर दाढि कटिंग मोफत करुन देण्यात आली व मतदान केलेल्या महिलांचा सन्मान समाजसेवीका पुजा पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मतदान जागृती अभियानामध्ये ज्युनियर चार्ली फाउंडेशन चे कलाकार सोमनाथ स्वभावणे, यांनी अनेक बुथवर जाणवु मतदानाची जनजागृती केली या जनजागृती अभियानात सु-लक्ष्मी सेवाभावी संस्थेचे सुमित पंडित,समाजसेविका पुजा पंडित आदिनी मदतकार्य केले.यात वीजय निंबाळकर,मनोज वखरे,गणेश जाधव,सह अनेक मतदारांनी या योजनेचा लाभ घेत यांनी सक्रिय सहभाग घेतला.

## जटवाडा येथे होनार पंचामृत अभिषेक महाप्रसाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती सभाजीनगर/प्रतिनिधी** / श्री.१००८ संकटहर पाश्र्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे १८ जानेवारी रविवारी रोजी आर्यिका सौभाग्यमती माताजी याचा सानिध्यात सकाळी १० वाजता मुलनायक श्री.संकटहर पाश्र्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक व णमोकार भक्ती मंडळचा साग्रसगीतात अभिषेक करण्यात येणार आहे. यावेळी सर्व उपस्थित समाज बांधवांना सकाळी ११ते २ या वेळेस अशोक कुमार स्व राजकुमार शरदकुमार के अजितकुमार गगवाल परीवार



वाकलावाला छत्रपती सभाजीनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे.अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा आरती करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादी दाता परिवार व जटवाडा क्षेत्राचे विश्श्वस्थ मंडळ यांनी केले आहे .श्री.क्षेत्र जैनगिरी येथे महिन्याच्या प्रत्येक अमावस्येला भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येत असतो तसेच यावेळी महाप्रसादाचेही आयोजन केले जाते.

## कै, माजी जेष्ठ सरपंच डॉ बाबुराव पवार यांच्या स्मरणार्थ मोफत वाचनालय सेवा सुरू करण्यात आली

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी/ फिरोज मन्सुरी**/गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन गावचे असलेले आधारस्तंभ आणि गावाच्या विकासासाठी महत्वपूर्ण योगदान देणारे. सावंगी ग्रुप ग्राम पंचायतीवर तीन दशकांपासून अंदाजे ३० ते ३५ वर्षापासून सरपंचपद भूषवणारे कै, डॉ बाबुराव पवार यांच्या स्मरणार्थ मोफत सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन महा अंनिसचे कार्याध्यक्ष भास्कर बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले.

दरम्यान याप्रसंगी वाचाल तर वाचाल या विषयावर भास्कर बनसोडे के के जाधव भालचंद्र साळुंके ज्ञानेश्वर वाघचौरे यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक किशोर पवार यांनी केले तर



सुत्रसंचालन प्रशांत दाभाडे व आभार प्रदर्शन शरद पवार यांनी केले.

याप्रसंगी शामराव बागुल, मोहनराव खंडागळे, सुनील दुशिंग, गौतम आमराव, अंबादास नरवडे, दिगंबर गोटे, डॉक्टर अभिजीत पवार, संदीप त्रिभुवन, नागसेन बागुल, राहुल आमराव, सिद्धार्थ गायकवाड,सर्पमित्र रिचर्ड बत्तीशे, कैलास ठाकूर उपस्थित होते. याप्रसंगी वाचन संस्कृती रुजविण्यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पराभव स्वीकारून जनसेवेचा वसा पुढेच नेणार! - सौ. उज्वला मुंढे यांचा कार्यकर्त्यांना निर्धार

आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मध्ये प्रभाग क्र. १० (ब) मधून आम आदमी पार्टीच्या अधिकृत उमेदवार म्हणून मी निवडणूक लढवली. या निवडणुकीचा कौल माझ्या विरोधात गेला असला, तरी मी हा जनादेश नम्रपणे स्वीकारते.जय-पराजय हा लोकशाहीचा एक भाग आहे.

निवडणुकीत जरी यश मिळाले नसले, तरी लोकांच्या प्रश्नांसाठी लढण्याची माझी जिद्द अधिक मजबूत झाली आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने हजारो लोकांशी संपर्क आला, प्रेम मिळाले आणि समस्या



समजून घेता आल्या. त्यामुळे खचून न जाता, मी पुन्हा एकदा नव्या जिद्दीने आणि उमेदीने समाजकार्यासाठी सज्ज आहे.

या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत ज्या मतदारांनी मला मतदान केले, तसेच ज्या हितचिंतकांनी, नातेवाईकांनी, मित्रपरिवाराने आणि माझ्या 'आम आदमी पार्टी'च्या निष्ठावान कार्यकर्त्यांनी दिवस-रात्र मेहनत घेतली, त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानते. तुमचे हे ऋण मी कधीच विसरू शकणार नाही.

माझ्या सर्व कार्यकर्त्यांना माझे सांगणे आहे की, आपण हरलो असलो तरी थांबलेलो नाही. आपली लढाई सामान्यांच्या हक्कासाठी आहे आणि ती यापुढेही सुरूच राहील. आपण सर्वांनी पुन्हा एकदा एकजुटीने कामाला लागायचे आहे.

मी कायम आपल्या प्रभागातील नागरिकांच्या सुख-दुखात आणि अडीअडचणीत खंबीरपणे उभी राहीन, हा माझा शब्द आहे असे सौ. उज्वला मुंढे म्हणाल्या.

## मुक्त विद्यापीठाचा नवा पुढाकार: 'न्यायालयीन लिपिक सहाय्यक' पदविका अभ्यासक्रमाचा दिमाखदार शुभारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/**उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींचे गौरवोद्गारनाशिक । प्रतिनिधीयशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने (धउचजण) काळाची गरज ओळखून आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार कौशल्यधिष्ठित शिक्षणाकडे पाऊल टाकत, 'कार्यालयीन सहाय्यक (न्यायिक) लिपिक संवर्ग पदविका' या नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमाचा नुकताच शुभारंभ केला. रविवारी, ११ जानेवारी २०२६ रोजी विद्यापीठाच्या शैक्षणिक सभागृहात एका विशेष सोहळ्यात हा कार्यक्रम पार पडला. कायदेतज्ज्ञांची मांदियाळीया कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाचे न्यायमूर्ती श्री. संदीपकुमार मोरे व न्यायमूर्ती श्री. अभय मंत्री उपस्थित होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते. तसेच, महाराष्ट्र व गोवा राज्य बार कौन्सिलचे अध्यक्ष श्री. हर्षद निंबाळकर, नाशिकचे प्रधान जिल्हा न्यायाधीश श्री. श्रीचंद जगमलानी, निफाडचे जिल्हा न्यायाधीश श्री. अ. अ. अ. शेख, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन आणि विद्याशाखा संचालक डॉ. जयदीप निकम यांची प्रमुख उपस्थिती होती.न्यायव्यवस्थेच्या गरजांची पूर्ततायावेळी बोलताना न्यायमूर्ती संदीपकुमार मोरे म्हणाले की, डॉक्टर-इंजिनिअर या पारंपारिक वाटांव्यतिरिक्त अनेक कौशल्याधिष्ठीत क्षेत्रांत रोजगाराच्या संधी आहेत.

मुक्त विद्यापीठाने हा अभ्यासक्रम सुरू करून युवकांसाठी रोजगाराचे नवे दालन उघडले आहे. त्यांनी पुढे सुचवले की, विद्यापीठाने आता लघुलेखक (स्टेनो) सारख्या दुर्लक्षित पण महत्त्वाच्या विषयांकडेही लक्ष द्यावे.

न्यायमूर्ती अभय मंत्री यांनी नमूद केले की, या अभ्यासक्रमामुळे शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागांतील विद्यार्थ्यांना एक सक्षम पर्याय मिळाला असून, यामुळे न्यायालयीन कामकाजात सुलभता येईल.कायदेविषयक मदतीचे आश्वासनकार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी दोन महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या:वेबबँक सुविधा: बार कौन्सिल ऑफ इंडियाचे माजी अध्यक्ष श्री. जयंत जायभावे यांनी विद्यार्थ्यांना माफक शुल्कात कायदेविषयक दस्ताऐवज असलेली 'वेबबँक' उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.मॅन्युअल्सची उपलब्धता: बार कौन्सिलचे अध्यक्ष श्री. हर्षद निंबाळकर यांनी विद्यार्थ्यांना सिव्हील व क्रिमिनल मॅन्युअल सहजरित्या उपलब्ध करून देण्याचे जाहीर केले.भविष्यात 'विधी' शाखा सुरू करण्याचा मानसकुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विश्वास व्यक्त केला की, या अभ्यासक्रमामुळे न्यायालयीन कामकाजात अचूकता येईल.

भविष्यात विद्यापीठामार्फत विधी (डरु) शाखेचा पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरू करण्याचा मानस असून, त्यासाठी बार कौन्सिलने सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.अभ्यासक्रमाचे स्वरूप एका दृष्टिक्षेपातविद्यापीठाने या अभ्यासक्रमासाठी चार विशेष पाठ्यपुस्तकांचे प्रकाशनही यावेळी मान्यवरांच्या हस्ते केले. या अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

घटकतपशीलकालावधी१ वर्षएकूण क्रेडिट्स२४ क्रेडिट्सविषय १न्यायालयीन कामकाजात मराठी भाषेचा वापर व इतिहासविषय २सामान्य ज्ञानविषय ३ कार्यालयीन सहाय्यक विषय ४प्रात्यक्षिक (Practical)

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
जालना शनिवार, १७ जानेवारी २०२६


## संक्षिप्त

### अनुसूचित जाती व नवबौध्द घटकाकरिता मिनी ट्रॅक्टरसाठी २३ जानेवारी पर्यंत पुर्तता करा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गटांना ९ ते १८ अश्वशक्तीचे मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने ९० टक्के अनुदानावर वाटप करण्यात येतात.सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील सदर दि. ३१ मे २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने जालना जिल्ह्यातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गटांनी सहायक आयुक्त, समाज कल्याण जालना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जालना कार्यालयात सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संबंधित बचत गटाकडून प्राप्त झालेल्या अर्जाची छानणी करण्यात आली असून प्राप्त अर्जातील काही बचत गटांचे कागदपत्रे अपुर्ण असल्याने कागदपत्राची त्रुटी पुर्तता करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जालना येथील सुचना फलकावर यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.तरी त्रुटीत असलेल्या बचत गटांनी दि. २३ जानेवारी २०२६ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळुन कार्यालयीन वेळेत त्रुटी पुर्तता करण्यासाठी यावे असे आवाहन सहायक आयुक्त, समाजकल्याण अनिल सुनगत यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### पैठणी विणकाम प्रशिक्षण ;दि.३० पर्यंत अर्ज मागविले

**आत्ताच एक्सप्रेस/छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळांतर्गत मऱ्हाटी पैठणी केंद्र, संत ज्ञानेश्वर उद्यान रोड, पैठण यांच्या तर्फे भरजरी पैठणी विणकाम प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार असून त्यासाठी इच्छुक प्रशिक्षणार्थींकडून शुक्रवार दि.३० पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत. या प्रशिक्षणासाठी ३० प्रशिक्षणार्थींची निवड करण्यात येणार असून प्रशिक्षण कार्यक्रम सहा महिने कालावधीचा आहे.

# शिवमहापुराण कथा सप्ताहात महादेव-पार्वती विवाह सोहळा भक्तिभावात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/अंबड तालुक्यातील ताडहादगाव येथील श्री क्षेत्र ताडेश्वर महादेव मंदिर परिसरात आयोजित अखंड शिवमहापुराण कथा सप्ताहाच्या पाचव्या दिवशी महादेव-पार्वती विवाह सोहळा अत्यंत भक्तिमय,मंगलमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.या दिव्य विवाह सोहळ्यामुळे संपूर्ण गाव अक्षरशः शिवमय झाले असून,भाविकांच्या श्रद्धा व भक्तीला उधाण आले.संपूर्ण सप्ताहभर चाललेल्या शिवमहापुराण कथेतला हा एक महत्त्वाचा प्रसंग म्हणून विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता.महादेवाचे पात्र माधवी काकासाहेब आणि पार्वती मातेचे पात्र विश्वरी दत्तात्रेय वाघुंडे यांनी अत्यंत प्रभावीपणे साकारले,ज्यामुळे उपस्थित भाविक भावविवश झाले.मंदिर परिसरात रंगीबेरंगी फुलांची सजावट,आकर्षक मंडप,मंगल अक्षदा,तोरणे आणि दिव्यांची रोषणाई यामुळे संपूर्ण परिसर मंगलमय वातावरणात न्हालेला होता. पारंपरिक वैदिक मंत्रोच्चारात आणि हर हर महादेव व जय पार्वती माता या जयघोषात विवाह विधी संपन्न झाला.हा अलौकिक अनुभव घेण्यासाठी ताडेश्वर महादेवाचे भक्त,ग्रामस्थ,महिला,युवक तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.



विवाह सोहळ्याच्या वेळी टाळकरी व भजनी मंडळाच्या सुश्राव्य भजनांनी तसेच टाळ-मृदंगाच्या निनादाने मंदिर परिसर दुमदुमून गेला.भक्त शिव भोळा चक्रवर्ती,त्याचे पाय माझ्या चित्ती या भावभावनेतून संपूर्ण सप्ताहभर भक्तिरसात तल्लीन झाले.अखंड शिवमहापुराण कथा सप्ताहादरम्यान दररोज सकाळी व सायंकाळी विविध धार्मिक विधी,अभिषेक,रुद्राभिषेक, कीर्तन,प्रवचन व हरिपाठाचे आयोजन करण्यात आले. शेकडो भाविकांनी या कार्यक्रमांचा लाभ घेत आत्मिक समाधान अनुभवले. विशेषतःमहिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेत कार्यक्रमाची शोभा वाढवली,तर युवकांनी सेवा,शिस्त व व्यवस्थापनात मोलाचे योगदान दिले.अखंड कथा सप्ताहाचा समारोप गुरुवार, दि. १६ जानेवारी रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांसह महाप्रसादाच्या आयोजनासह होणार आहे.या कार्यक्रमामुळे ताड हादगाव व परिसरात आध्यात्मिक चैतन्य, सामाजिक एकोपा व भक्तीभाव निर्माण झाला असून, भाविकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.श्री ह.भ.प.श्री स्वामी बालकानंद सरस्वती जी महाराज,श्री दत्त संस्थान मुद्रेगांव यांच्या मधूर वाणीमधून कथा सांगितल्या जात आहेत.विशेषतः १४ जानेवारी,बुधवार संक्रांतीच्या मुहूर्तावर तिर्थापुरी पोलिस स्टेशनमध्ये कार्यरत पोलिस जमादार ह.भ.प.श्री योगेश महाराज गायके यांचे किर्तन होणार आहे,ज्यामध्ये भाविकांना उपस्थित राहून आध्यात्मिक अनुभव घेता येईल.

# तडीपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या इसमावर गोंदी पोलिसांचा कडक कारवाईचा बडगा




**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी.गणेश सपकाळ**/ मा.पोलीस अधीक्षक जालना यांनी आदेश जा.क्र. स्थागुशा/मपोका क्र. ५५/२०२५-२८४८ जालना दि.१०/११/२०२५ अन्वये पोलीस ठाणे गोंदी हद्दीतील एकूण ११ इसमावर महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ५५ (१) अन्वये हद्दपारीचा प्रस्ताव मंजूर करून त्यांना एका वर्षासाठी जालना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेले आहे.तरी दि १३/०१/२०२६ रोजी ११.३० वाजेच्या सुमारास पोलीस ठाणे गोंदी प्रभारी अधिकारी सपोनि आशिष खांडेकर सोबत,पोउपनि हावले,पो का दिपक भोजने,शेख असे गोंदी गावात असताना हद्दपार इसम नामे गणेश कैलास मरकड वय २६ वर्ष रा गोंदी ता अंबड जि जालना,हा गोंदी गावामध्ये त्याचे ताब्यात विना क्रमांकाचे लाल रंगाचे स्वराज ७४४ दढ कंपनीचा ट्रॅक्टर व त्याची ट्रॉली जोडलेली हा घेऊन भाग्यनगर च्या दिशेने जाताना दिसला.त्यास थांबवण्यासाठी हात केला असता त्याने त्याचे ताब्यातील स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर व ट्रॉली ही घेऊन भरधाव वेगात भाग्यनगरकडे सार्वजनिक ठिकाणी ट्रॅक्टर पळवला व पोलीस पथकाने त्याचा पाठला केला. असता त्यांनी त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर हे भाग्यनगर येथे सोडून उसाच्या शेतीमध्ये पळून गेला सदरचे ट्रॅक्टर व ट्रॉली हे जप्त करण्यात आलेली असून हद्दपार आरोपी नामे गणेश कैलास मरकड वय २६ वर्ष राहणार गोंदी. ता.अंबड जि. जालना यास मा पोलीस अधीक्षक जालना यांनी कलम ५५ (१) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९९१ अन्वये आदेशाची उल्लंघन केले.म्हणून त्याच्यावर पोलीस ठाणे गोंदी येथे गुरंन १०/२०२६ कलम २८१ भा न्या स व सह कलम १४२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९९१ अनन्वय गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे सदरची कार्यवाही सपोनी आशिष खांडेकर व त्यांच्या पथकाने केली असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोउपनि एस एम मुपडे हे करीत आहेत.तसेच इतर हद्दपार व तडीपार इसमाच्या हालचालीवर देखील लक्ष ठेवून असल्याचे प्रभारी अधिकारी सपोनि आशिष खांडेकर यांनी सांगितले आहे.

# जालना मनपावर भाजपचा झेंडा! रावसाहेब दानवे आणि माझी जोडी 'जय-वीरू'सारखी; आमदार बबनराव लोणीकरांचा विरोधकांना इशारा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ४१ जागा जिंकत ऐतिहासिक आणि निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. या विजयानंतर जालना जिल्ह्यात भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, आमदार बबनराव लोणीकर यांनी या विजयाचे श्रेय कार्यकर्त्यांच्या मेहनतीला आणि जिल्ह्यातील भक्कम नेतृत्वाला दिले आहे. रावसाहेब दानवे आणि माझी जोडी ही 'जय-वीरू'सारखी असून, ही एकजूटच भाजपच्या विजयाचा पाया आहे, असे विधान लोणीकर यांनी केले.

बूथ नियोजनाचा 'विजयादशमी' फॉर्म्युला

विजयानंतर आयोजित कार्यकर्ता संवाद कार्यक्रमात बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, हा विजय केवळ एका नेत्याचा नसून संघटनेचा आहे. बूथ पातळीवर आखलेली सूक्ष्म रणनीती, मतदार याद्यांची बारकाईने केलेली तपासणी आणि प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्याचे नियोजन यामुळेच ४१ जागांवर भाजपला यश मिळाले. मतदानाच्या दिवशी कार्यकर्त्यांनी लावलेली जिवाची बाजी हीच या यशाची खरी शक्ती असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.

नेतृत्वाची एकजूट आणि 'जय-वीरू'ची जोडी

जिल्ह्यातील राजकीय समीकरणांवर भाष्य करताना लोणीकर यांनी भाजपमधील एकीवर जोर दिला. ते म्हणाले:रावसाहेब दानवे आणि माझी जोडी ही 'जय-वीरू'सारखी आहे. आम्ही सर्व नेते-दानवे, लोणीकर, गोरंट्याल-एकत्र आणि स्पष्ट भूमिकेसह काम करत आहोत. आमची ही ताकद आणि कार्यकर्त्यांची कार्यकुशलता यांच्या जोरावरच आज जालना महानगरपालिकेत भाजपचा महापौर विराजमान होत आहे.यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाचेही आभार मानले.

लोणीकर यांनी स्पष्ट केले की, जालना महानगरपालिकेचा महापौर, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष आणि सर्व सभापती हे केवळ भारतीय जनता पक्षाचेच असतील. ही सत्ता जनतेच्या विकासासाठी आणि कार्यकर्त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी वापरली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.



आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोणीकर यांनी 'मिशन ५०'ची घोषणा केली. जालना महानगरपालिकेचा विजय ही केवळ सुरुवात आहे. आता आमचे लक्ष्य जिल्हा परिषद आहे. तेथे ५० जागा निवडून आणून भाजपचा झेंडा फडकवणारच, असा आक्रमक पवित्रा त्यांनी घेतला. कार्यकर्त्यांनी आता अधिक जोमाने कामाला लागावे, असा संदेशही त्यांनी दिला.

# शिवमहापुराण कथा सप्ताहात महादेव-पार्वती विवाह सोहळा भक्तिभावात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/अंबड तालुक्यातील ताडहादगाव येथील श्री क्षेत्र ताडेश्वर महादेव मंदिर परिसरात आयोजित अखंड शिवमहापुराण कथा सप्ताहाच्या पाचव्या दिवशी महादेव-पार्वती विवाह सोहळा अत्यंत भक्तिमय,मंगलमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.या दिव्य विवाह सोहळ्यामुळे संपूर्ण गाव अक्षरशः शिवमय झाले असून,भाविकांच्या श्रद्धा व भक्तीला उधाण आले. संपूर्ण सप्ताहभर चाललेल्या शिवमहापुराण कथेतला हा एक महत्त्वाचा प्रसंग म्हणून विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता.महादेवाचे पात्र माधवी काकासाहेब आणि पार्वती मातेचे पात्र विश्वरी दत्तात्रेय वाघुंडे यांनी अत्यंत प्रभावीपणे साकारले,ज्यामुळे उपस्थित भाविक भावविवश झाले.मंदिर परिसरात रंगीबेरंगी फुलांची सजावट,आकर्षक मंडप,मंगल अक्षदा,तोरणे आणि दिव्यांची रोषणाई यामुळे संपूर्ण परिसर मंगलमय वातावरणात न्हालेला होता.

पारंपरिक वैदिक मंत्रोच्चारात आणि हर हर महादेव व जय पार्वती माता या जयघोषात विवाह विधी संपन्न झाला. हा अलौकिक अनुभव घेण्यासाठी ताडेश्वर महादेवाचे भक्त,ग्रामस्थ,महिला,युवक तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

विवाह सोहळ्याच्या वेळी टाळकरी व भजनी मंडळाच्या सुश्राव्य भजनांनी तसेच टाळ-मृदंगाच्या निनादाने मंदिर परिसर दुमदुमून गेला.भक्त शिव भोळा चक्रवर्ती,त्याचे पाय माझ्या चित्ती या भावभावनेतून संपूर्ण सप्ताहभर भक्तिरसात तल्लीन झाले.

अखंड शिवमहापुराण कथा सप्ताहादरम्यान दररोज सकाळी व सायंकाळी विविध धार्मिक विधी,अभिषेक,रुद्राभिषेक, कीर्तन,प्रवचन व हरिपाठाचे आयोजन करण्यात आले.शेकडो भाविकांनी या कार्यक्रमांचा लाभ घेत आत्मिक समाधान अनुभवले.विशेषतःमहिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेत कार्यक्रमाची शोभा वाढवली,तर युवकांनी सेवा,शिस्त व व्यवस्थापनात मोलाचे योगदान दिले.अखंड कथा सप्ताहाचा समारोप गुरुवार, दि. १६ जानेवारी रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांसह महाप्रसादाच्या आयोजनासह होणार आहे.या कार्यक्रमामुळे ताड हादगाव व परिसरात आध्यात्मिक चैतन्य, सामाजिक एकोपा व भक्तीभाव निर्माण झाला असून, भाविकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

ह.भ.प.श्री स्वामी बालकानंद सरस्वती जी महाराज,श्री दत्त संस्थान मुद्रेगांव यांच्या मधूर वाणीमधून कथा सांगितल्या जात आहेत.विशेषतः १४ जानेवारी,बुधवार संक्रांतीच्या मुहूर्तावर तिर्थापुरी पोलिस स्टेशनमध्ये कार्यरत पोलिस जमादार ह.भ.प.श्री योगेश महाराज गायके यांचे किर्तन होणार आहे,ज्यामध्ये भाविकांना उपस्थित राहून आध्यात्मिक अनुभव घेता येईल.

### प्रजासत्ताक दिनी संविधानाचा जागर होणे गरजेचे

**आत्ताच एक्सप्रेस**

**धर्माबाद (प्रतिनिधी)** २६ जानेवारी १९५० रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेली जगातील सर्वश्रेष्ठ आणि लिखित स्वरूपातील राज्यघटना अंमलात आली. या दिवसापासून खऱ्या अर्थाने देशाने प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून नवी वाटचाल सुरू केली. या ऐतिहासिक दिनाचे औचित्य साधून सर्व शासकीय आणि निमशासकीय संस्थांमध्ये संविधानाचा जागर होणे काळाची गरज आहे, अशी मागणी स्वाभिमानी ब्रिगेड संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळा, महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयांमध्ये विविध सांस्कृतिक व देशभक्तीपर कार्यक्रम राबवले जातात. मात्र, या कार्यक्रमांसोबतच संविधानाच्या 'उद्देशिकेचे' (प्रस्तावना) सामुदायिक वाचन करून संविधानाचा जागर केला जावा, अशी आग्रही मागणी स्वाभिमानी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय सज्जन सिरजखोडकर यांनी एका निवेदनाद्वारे उपविभागीय कार्यालयाकडे केली आहे.

प्रतिमा पूजन: शासन परिपत्रकानुसार सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, शाळा-महाविद्यालयांमध्ये ध्वजारोहण प्रसंगी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा लावणे अनिवार्य करावे.

सामुदायिक वाचन: सकाळी ध्वजारोहण समारंभ पार पडल्यानंतर उपस्थित सर्वांनी मिळून संविधान उद्देशिकेचे वाचन करावे, जेणेकरून नागरिकांमध्ये संविधानातील मूल्यांची रुजवण होईल.

शासकीय नियमांची अंमलबजावणी: शासनाच्या नियमानुसार संविधानाचा जागर करण्यासाठी प्रशासनाने विशेष सूचना निर्गमित कराव्यात.

देशाचा डोलारा संविधानावर उभा आहे. त्यामुळे प्रजासत्ताक दिनी केवळ औपचारिकता न पाळता, प्रत्येक नागरिकाला संविधानाची ओळख आणि त्यातील कर्तव्यांची जाणीव होण्यासाठी संविधानाचा जागर होणे आवश्यक आहे. - दत्तात्रय सज्जन सिरजखोडकर (तालुकाध्यक्ष, स्वाभिमानी ब्रिगेड) या मागणीचे निवेदन उपविभागीय कार्यालयात सादर करण्यात आले असून, प्रशासनाने यावर सकारात्मक पाऊल उचलून सर्व संबंधित विभागांना तसे आदेश द्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अतिक्रमणाच्या नावाखाली गरीबांना बेघर करण्याचा डाव खपवून घेणार नाही- आमदार बबनराव लोणीकर

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** गोदावरी खोरे विकास महामंडळ,पैठण येथील कार्यकारी अभियंता अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली २५ ते ३० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांना बेघर करण्याचा प्रयत्न करत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, याबाबत आमदार बबनराव लोणीकर यांनी कार्यकारी अभियंत्यांशी दूरध्वनीवरून आक्रमक शब्दांत जाब विचारला.या कारवाईमागे शासनाची सूचना असल्याचे स्पष्टीकरण कार्यकारी अभियंत्यांनी दिले असून या उत्तरावर आमदार बबनराव लोणीकर यांचे समाधान झाले नाही.

२५-३० वर्षांपासून ही माणसं तिथं राहतायत. त्यांची घरं पाडून तुम्ही त्यांना रस्त्यावर आणणार आहात का?असा थेट सवाल करत त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की,या नागरिकांना बेघर करण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही.

आमदार बबनराव लोणीकर म्हणाले, आज राज्यभरात शासन स्तरावर मालकी हक्क नसलेल्या जागांवर राहणाऱ्या नागरिकांना हक्काचं घर देण्याची मोहीम सुरू आहे. मग इथे २५-३० वर्षांपासून राहणाऱ्या लोकांना तुम्ही बेघर कसं काय करू शकता? हा कुठला न्याय आहे? ते पुढे म्हणाले की, अतिक्रमण हटवायचंच असेल तर निवडक लोकांवर कारवाई करून चालणार नाही.

काढायचेच असतील अतिक्रमण, तर पैठणपासून नांदेडपर्यंत जेवढी अतिक्रमणं आहेत ती सगळीच काढावी लागतील. फक्त गरिबांच्या घरांवर हात टाकण्याचं धाडस करू नका, असा इशाराही आमदार बबनराव लोणीकर यांनी दिला.

लोकांना घराबाहेर काढल्यास कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल.

आमदार लोणीकर यांनी कार्यकारी अभियंत्यांना ठाम शब्दांत सांगितले की,अतिक्रमणाच्या नावाखाली या लोकांची घरं खाली केल्यानंतर त्यांनी राहायचं कुठं? याचा विचार केलाय का? या नागरिकांना घराबाहेर काढल्यास मोठा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील. याचबरोबर त्यांनी स्पष्ट सूचना देत सांगितले की, हा विषय सर्व आमदार एकत्र येऊन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी चर्चा करेपर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई करू नये. तोपर्यंत एकाही नागरिकाला घराबाहेर काढू नका.

असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी कार्यकारी अभियंता यांना स्पष्ट शब्दात सांगितले.आमदार बबनराव लोणीकर यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे संबंधित नागरिकांमध्ये दिलास्याचे वातावरण निर्माण झाले असून, गरीब, कष्टकरी आणि वंचितांच्या पाठीशी ठामपणे उभा राहणारा नेता अशी त्यांची प्रतिमा पुन्हा एकदा ठळकपणे समोर आली आहे.

अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली अन्यायकारक कारवाई झाल्यास रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याचा इशाराही त्यांनी अप्रत्यक्षपणे दिला असून, हा विषय आता राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### युवकांनी जीवनात सकारात्मक दृष्टिकोन अंगी बाळगायला हवा: शिक्षक बाबासाहेब गोंटे यांचे सुखापुरी येथे प्रतिपादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/जीवनात यशाचे शिखर गाठण्यासाठी युवकांनी नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे. प्रयत्नांची पराकाष्ठा, कठोर मेहनत आणि परिश्रमाच्या जोरावरच यशस्वी जीवनाची वाटचाल करता येते, असे प्रतिपादन अंबड येथील मत्स्योदरी विद्यालयाचे शिक्षक बाबासाहेब गोंटे यांनी केले. अंबड येथील मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ (छत्रपती संभाजीनगर) यांच्या संयुक्त विद्यमाने सुखापुरी (ता. अंबड) येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय विशेष शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरातील बौद्धिक सत्रात 'युवक आणि सकारात्मकता' या विषयावर ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रवींद्र पाथरे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. विशाल खरात आणि सुखापुरी विद्यालयाचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर शिकारे उपस्थित होते. युवकांना मार्गदर्शन करताना बाबासाहेब गोंटे पुढे म्हणाले की:स्वतःची ओळख: प्रत्येक युवकाला आपण कोण आहोत, याची ओळख पटली पाहिजे. आत्मविश्वास: एकदा का आत्मविश्वास गमावला की यशाचे शिखर गाठणे कठीण होते. त्यामुळे मला जिंकायचेच आहे आणि त्यासाठीच माझा जन्म झाला आहे, ही खूणगाठ मनाशी बांधली पाहिजे. आजच्या युवकांनी सोशल मीडियाच्या आहारी न जाता, त्याचा वापर केवळ चांगल्या आणि रचनात्मक कामांसाठीच करावा.


# कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी खचज व खएज परीक्षेत मिळवली यशाची झेप....

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/गणेश सपकाळ**/कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयातील इयत्ता पहिली ते सातवीतील एकूण १०५ विद्यार्थी खचज व खएज परीक्षेत सहभागी झाले होते.

त्यात खचज परीक्षेत पुढील विद्यार्थी हे गोल्ड मेडल प्राप्त झाले आहेत,पवन खंदारे,सुरज जोशी, रुद्र गव्हाणे, गुंजन मस्के, आरोही गिरी, ईश्वरी देशपांडे, शुभम शिंदे, श्रेया जाधव,आरोही डोंबे, प्रियंका खंदारे, आराध्या साळुंके, तृप्ती घोडके, रेणुका शेळके, अमान शेख, विक्रांत माळोदे, स्वराज बडे, प्रसन्न बहुले, ओम गीतखाने, रुद्रा जाडकर, कृष्णा बडोदे, अर्पित गव्हाणे, अन्वय शेरकर,स्वरूप मुळे,श्लोक जाजू, नुमान शेख, सक्षम काकडे, पूजा ढाकणे, ओजस्वी साळवे, उर्मिला राखे, प्रगती मोहिते, अनुराग काळे व तसेच खएज परीक्षेत पुढील विद्यार्थी गोल्ड मेडल प्राप्त झाले आहेत.

श्रेया जाधव, प्रियंका खंदारे, विक्रांत माळोदे, वंश कुमावत तसेच इयत्ता तिसरीतील एकूण पंधरा विद्यार्थी हे दुसऱ्या लेवल साठी पात्र झाले आहेत.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई च्या उपाध्यक्षा सौ.ज्योतीभाभी ठाकूर, स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व्यंकटेशजी गोसावी, कार्यवाह केदारजी मंत्री, शालेय समितीचे अध्यक्ष श्रीपादजी जपे साहेब,तसेच सर्व पदाधिकारी,व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, मुख्याध्यापक मा.श्री प्रदीपजी जोशी सर, मूल्यमापन विभाग



प्रमुख श्रीम.सुवर्णलता खानापूरकर,सर्व वर्गशिक्षक सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813